# ऐकू कमी येणाऱ्यांसाठी कॉक्लियर इम्प्लांटची सुविधा

## लीलावती रुग्णालयाचा उपक्रम

**मुंबई** : मल्टि-स्पेशॅलिटी वैद्यकीय सुविधा देणाऱ्या लीलावती हॉस्पिटल आणि रिसर्च सेंटरने प्रगत शस्त्रक्रिया इम्प्लांट करण्यायोग्य श्रवण उपकरण कार्यक्रम सुरू करण्याची घोषणा केली. बहिरे किंवा श्रवणशक्ती कमी असलेल्या मुलांना जीवन बदलणारे कॉक्लियर इम्प्लांट उपलब्ध करून देणे हे या कार्यक्रमाचे उद्दिष्ट आहे, जे १०० टक्के ऐकण्यास मदत करू शकतात. आर्ट ऑफ लिव्हिंगचे संस्थापक गुरुदेव श्री रविशंकर यांच्या हस्ते याचे उद्घाटन करण्यात आले.

श्रवणदोष ही भारतातील गंभीर परंतु दुर्लक्षित स्थिती आहे. डब्ल्यूएचओच्या मते, भारतातील प्रत्येक एक हजार मुलांपैकी सहा मुलांची कमी होते. ज्यामुळे त्यांना आयुष्यभर अनेक गैरसोयींचा सामना करावा लागतो. योग्य वयात कॉक्लीअर इम्प्लांट करून घेतल्यास श्रवण अक्षमतेचे हे गंभीर नुकसान कमी करता येते. दुर्दैवाने, ज्या रुग्णांना या उपकरणांची गरज आहे, अशा बहुतेक रुग्णांना जास्त किंमत किंवा तज्ज्ञांचा अभाव अशा बऱ्याच कारणांमुळे त्यांचा लाभ घेणे शक्य होत नाही.

लीलावतींचा सर्वांगीण सर्जिकल इम्प्लांट करण्यायोग्य श्रवण उपकरण कार्यक्रम ईएनटी, न्यूरोलॉजिस्ट, बालरोगतज्ज्ञ, मानसोपचार तज्ज्ञ आणि सामाजिक कार्यकर्त्यांसह तज्ज्ञांच्या टीमद्वारे संपूर्ण मूल्यमापन प्रदान करतो. यात वैद्यकीय नोंदींची बारकाईने देखभाल, अत्याधुनिक उपकरणांसह आधुनिक सुसज्ज ऑपरेशन थिएटर्स, घरातील पुनर्वसन आणि जलदगतीने केलेले समस्यानिवारण यांचाही समावेश आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, या सर्व सेवा उपेक्षित आणि सामाजिक-आर्थिकदृष्ट्या दुर्बल समाजातील कुटुंबांसाठी मोठ्या प्रमाणात अनुदानित दरांवर उपलब्ध आहेत.